# बाबा मुक्तानंदांच्या शिकवणी

सिद्धयोग मार्गावर, ऑक्टोबर हा महिना बाबा मुक्तानंदांचे, त्यांच्या असामान्य जीवनाचे आणि त्यांनी प्रदान केलेल्या वारश्याचे स्मरण करण्यासाठी आणि त्यांचा सन्मान करण्यासाठी समर्पित केला जातो. याच महिन्यात बाबांनी महासमाधी घेतली — महासमाधी म्हणजे परम चितीशी महाऐक्य.

बालपणापासूनच बाबांमध्ये भगवंताला जाणण्याची तीव्र उत्कंठा होती. सर्वांच्या हृदयांमध्ये विद्यमान असलेल्या दिव्यतेशी ऐक्य साधण्यासाठी त्यांनी आध्यात्मिक साधनेप्रति स्वतःला समर्पित केले. त्यांच्या शुद्धतम स्वप्रयत्नाद्वारे आणि त्यांचे श्री सद्‌गुरू, भगवान नित्यानंद यांच्या कृपेने बाबा सिद्धयोग गुरू बनले; असे गुरू ज्यांच्यात शक्तिपात दीक्षारूपी महाप्रसादाद्वारे इतरांमध्ये जागृती घडवून आणण्याचे सामर्थ्य असते.

सिद्धयोग मार्ग हा अनोखा मार्ग आहे, कारण ‘शक्तिपात’ ही त्याची प्रेरकशक्ती आहे; शक्तिपात म्हणजे सिद्धयोग गुरूंच्या कृपेने साधकाच्या अंतर्निहित शक्तीची अर्थात् कुंडलिनी शक्तीची जागृती. एकदा कुंडलिनी जागृत झाली की, साधकाचे ध्यान सहज-स्वाभाविक होऊ लागते. ही आंतरिक शक्ती आपल्या प्रयत्नांना मार्गदर्शित करते व आधार देते, जेणेकरून आपण विशिष्ट वृत्तींनी बद्ध झालेल्या मनाच्या सीमिततांच्या पलीकडे जाऊन आपल्या अंतरस्थ आत्म्याचे म्हणजेच विशुद्ध चितिचे ज्ञान प्राप्त करावे.

बाबांच्या शिकवणी वाचत असताना मनन करा की, तुम्ही बाबांच्या शब्दांमधून असे काय शिकू शकता जे तुमच्या अध्ययनाला व ध्यानाच्या अभ्यासाला सखोल बनवेल.

© २०१९ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.